**स. क्रि.केस नं. १०१६/२०२४**

महाराष्ट्र शासन वि.श्रावण दिलीप जाधव

**निशाण नं. १०/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – संजय अंबाजी रोकडे

वय – ५४ वर्षे

धंदा – व्यवसाय

राहणार – मोहरे ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे सुरु,</u>**

१. हे म्हणणे खरे नाही की, दि. १२.०६.२०२४ रोजी वारणा साखर कारखान्याच्या पाठीमागे असलेल्या कॅनॉल जवळच्या रिकामी जागी पंचनाम्याकरिता बोलवले नव्हते. त्यावेळी मी व दुसरे पंच आकाश जाधव व पोलीस हे तेथे गेलो असता आरोपी हा तेथे दारु सेवन करत होता व त्या ठिकाणी जप्ती पंचनामा केला असे घडले नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर अनु क्र. २ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूराविषयी मला सांगता येणार नाही. सही पावेतो **<u>नि. ११</u>** देण्यात येत आहे.

**(साक्षीदार सरकार पक्षास पूरक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांना उलट प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२.हे म्हणणे खरे नाही की, दि. १२.०७.२०२४ रोजी मी व दुसरे पंच आकाश जाधव तसेच पोलीस स्टाफ हे वारणा साखर कारखाना पाठीमागे असलेल्या कॅनॉल कडे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलिसांसोबत गस्त करत असताना तेथे कॅनॉलजवळील उघडया जागेवर एक इसम दारु सेवन करत असल्याचे दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमास चाहूल लागल्यामुळे तो पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला आम्ही पकडले. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमास आम्ही नाव विचारले असता त्याने त्याचे नाव श्रावण दिलीप जाधव रा. बहिरेवाडी असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमास तेथे उपस्थीत असल्याचे कारण विचारले असता त्याने त्याच्या तोंडाचा उग्र व आंबट वास येत असल्याचे आढळून आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमाची माझे समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कडे एक उग्र वासाचा काचेचा ग्लास व टयुबर कंपनीची एक बिअर ६५० मिलीची एक बाटली त्यामध्ये १०० मिली बिअर शिल्लक आढळून आली. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमाचा मुद्देमालासह जागीत पंचनामा करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा वाचून घेवून तो योग्य असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली होती.

३. माझे शिक्षण ९वी पर्यंत झाले आहे तसेच मला लिहीता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी सदर कागदातील मजकूर मी वाचून तो समजून घेवून मगच त्यावर मी सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, कागदातील मजकूर खोटा अथवा चुकीचा असल्यास मी त्यावर सही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बहिरेवाडी हे माझ्या गावाजवळील गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर गावातील लोकांविषयी मला माहिती आहे.

४. आरोपी हा बहिरेवाडी गावचा आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझा मित्र असल्यामुळे त्याला वाचविण्याच्या हेतूने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एस. पी. लोखंडे यांचेतर्फे नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. ०३.०९.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा